# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION

कार्यालयः स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/आ.प्र/२८/२०२१-२२ दिनांक : १२/०४/२०२१

## // परिपत्रक //

विषय :- गुढीपाडवा 2021 सणानिमित्त मार्गदर्शक सूचना.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांच्याकडील क्रमांक: आरएलपी-0421/प्र.क्र.109/ विशा-1ब, दि.12 एप्रिल, 2021.

सालाबादप्रमाणे गुढीपाडवा हा सण या वर्षी दि.13 एप्रिल, 2021 रोजी साजरी केला जाणार आहे. सदर सण हा राज्यात नविन वर्ष म्हणून मोठया प्रमाणात साजरा करण्यात येत असतो. तथापि, सध्या कोविड-19 च्या लाटेमुळे उद्भवलेल्या अतिसंसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता व वाढत्या कोरोना रुग्णांच्या संख्येचा विचार करता महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई यांनी दि. 4 एप्रिल, 2021 नुसार पारीत केलेल्या आदेशानुसार व त्यातील मुद्दा क्र.1,2 व 13 च्या अधिन राहून या वर्षी गुढी पाडवा हा सण साधेपणाने साजरा करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत :-

1. गेल्या वर्षी राज्यात कोविड या संसर्गजन्य रोगाचा झालेला प्रादुर्भाव विचारात घेऊन आजपर्यंत झालेल्या सर्व सण/ उत्सव हे अत्यंत साध्या पध्दतीने व लोकांनी एकत्रित न जमता साजरे केलेले आहेत. सध्या कोरोनाच्या संसर्गाच्या प्रमाणात गेल्या वर्षी पेक्षा जास्त वाढ होत आहे. त्यामुळे यावर्षी गुढीपाडवा हा सण कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने अत्यंत साधेपणाने सकाळी 7.00 वाजेपासून संध्याकाळी 8.00 वाजण्यापुर्वी साजरा करणे अपेक्षित आहे.
2. राज्यांत कांही ठिकाणी गुढीपाडवा हा सण पारंपारिक वेशभूषा परिधान करुन तसेच सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन करून नवीन वर्ष म्हणून साजरा करण्यात येत असतो. कोविड-19 विषाणुचा वाढता फैलाव रोखण्याच्या दृष्टीने यावर्षी गुढीपाडव्यानिमित्त पालखी, दिंडी, प्रभात फेरी, बाईक रेली, मिरवणुका काढण्यात येऊ नयेत तसेच कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येऊ नये. त्याऐवजी आता सार्वजनिक ठिकाणी एकावेळी 5 पेक्षा जास्त व्यक्तींनीं एकत्र न येता सोशल डिस्टंन्सींगचे व स्वच्छतेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पालन करून घरगुती गुढी उभारुन हा सण अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात यावी.
3. गुढीपाडवा या सणाच्या दिवशी आरोग्यविषयक उपक्रम / शिबिर (उदा. रक्तदान) स्थानिक प्रशासनाच्या पुर्वानुमतीने आयोजित करत येतील आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू



12.04.2021.

इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करता येईल. तथापि आरोग्य विषयक उपक्रमांचे आयोजन करताना कोविड विषयक सर्व उपाययोजना करण्यात याव्यात, जेणेकरून कोरोनाचा संसर्ग / संक्रमण वाढणार नाही.

4. राज्यातील कोविड -19 विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका, पोलीस प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष गुढीपाडव्याच्या दिनांकापर्यंत शासनस्तरावरुन आणखी काही मार्गदर्शक सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

उक्त परिपत्रकाची सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करावी. सदरहू परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005 मधील कलम 51 ते 60, साथरोग नियंत्रण अधिनियम, 1897 व भारतीय दंड संहिता, 1860 मधील कलम 188 नुसार दंडनीय/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

12.04.21

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रत,**

1. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2. मा. पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3. मा. राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
4. मा. महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
5. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
6. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
7. मा. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा- भाईदर वसई-विरार.
8. मा. जिल्हाधिकारी, जि. ठाणे.
9. मा. उपमहापौर/ मा. सभापती, स्थायी समिती/ मा. सभागृह नेता/ मा. विरोधी पक्ष नेता/ सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
10. स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
11. उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
12. सर्व सहा. आयुक्त / सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
13. मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.